# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**
phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com

**प्रेसनोट क्र.५८ दिनांक २१/०६/२०२१**

## मनाई आदेशाचे उंल्लघन करणा-यावर इसमांवर पालघर पोलीस दलाकडुन कारवाई

संपुर्ण महाराष्ट्रात कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव प्रचंड वाढलेला आहे. राज्यभरात कोव्हीड-१९ चा वाढता प्रादुर्भाव रोखण्याकरिता महाराष्ट्र शासनाने मनाई आदेशाचे निर्बंध जाहीर करण्यात आले आहेत. सदर निर्बंधाचे पालघर जिल्हयामध्ये पालन करणे कामी मा.श्री.दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक, पालघर तसेच श्री.प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक, पालघर यांनी बिनतारी संदेशावरुन सदर आदेशान्वये कारवाई करण्याबाबत सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी तसेच पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना सविस्तर सुचना दिल्या आहेत. सदर सुचनांचे पालन पालघर जिल्हयामध्ये अत्यंत प्रभाविपणे करण्यात येत आहे.

### १.पालघर जिल्हयात नाकाबंदी दरम्यान २१६ केसेस

कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पालघर जिल्हा पोलीस दलाने १६ पोलीस ठाणे हद्दीमध्ये वळणचौकी, चाररस्ता, हातनदी नाका, माकुंसार, पुलनाका, पासटेंभी, माहिम, पारगाव, इंद्रप्रस्त, मसावली, एमआयडीसी नाका, खैरेफाटक, वाणगांव फाटक, पायमार्ग, सागर नाका, झाई, वेवजी, तलासरी नाका, उधवा, डहाणु नाका, नाशिक नाका, गेल्यास नाका, मायचन ओपी, चारोटी, खांडेश्वरी नाका, कुडुस नाका, पाटिल पाडा नाका, मोखाडा चौफुली इत्यादी २९ महत्वाच्या ठिकाणी नाकाबंदी लावली आहे. तसेच बाजारपेठा, रेल्वेस्थानके, बसस्टँड, रहीवासी वस्त्या अशा गर्दीच्या ठिकाणी बंदोबस्त लावण्यात आला आहे. व मनाई आदेशाचे उंल्लघन होणार नाही याची काळजी अत्यंत परिणामकारकपणे पालघर पोलीस दलाकडुन घेण्यात येत आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक, पोलीस उपअधिक्षक गृह, सर्व उपविभागिय पोलीस अधिकारी यांचेसह १६ पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी, १८ पोलीस अधिकारी व २५४ पोलीस अमंलदारांनी अंत्यत प्रभावीपणे कामगिरी करुन मनाई आदेशाचे उंल्लघन करणा-या व्यक्ती, संस्था, आणि संघटना इत्यादीवर नाकाबंदी दरम्यान २१६ केसेस करुन ४४,८००/- रुपये इतका दंड वसुल करण्यात आला आहे

### २. पर्यटना करिता फिरताना मिळुन आलेल्या २४ इसमांवर भादविसं कलम १८८ प्रमाणे ०२ गुन्हे दाखल

- दिनांक २०/०६/२०२१ रोजी १६:०० वा. चे सुमारास मेढवण खिंडीत अशेरी गडावर मा.जिल्हाधिकारी पालघर यांनी दिनांक १२/०६/२०२१ ते दिनांक ०९/०८/२०२१ या कालावधीमध्ये पालघर जिल्हयातील सर्व धबधबे, तलाव, धरणे, समुद्र किनारे, किल्ले इत्यादी ठिकाणी जाण्यास मनाई आदेश लागु केला असतांनाही आरोपी मनाई आदेश लागु केला असतांनाही आरोपी नं. १ ते ११ हे अशेरी गडावर पर्यटनाकरिता फिरताना मिळुन येवुन मा. जिल्हाधिकारी पालघर यांनी दिलेल्या आदेशाचा भंग केला म्हणुन सपोनि/उमेश पाटील, यांनी कासा पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र. II १०६/२०२१ भादविस कलम १८८ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

- दिनांक २०/०६/२०२१ रोजी १५:०० वा. चे सुमारास मेढवण खिंडीत अशेरी गडावर मा.जिल्हाधिकारी पालघर यांनी दिनांक १२/०६/२०२१ ते दिनांक ०९/०८/२०२१ या कालावधीमध्ये पालघर जिल्हयातील सर्व धबधबे, तलाव, धरणे, समुद्र किनारे, किल्ले इत्यादी ठिकाणी जाण्यास मनाई आदेश लागु केला असतांनाही आरोपी मनाई आदेश लागु केला असतांनाही आरोपी नं. १ ते १३ हे अशेरी गडावर पर्यटनाकरिता फिरताना मिळुन येवुन मा. जिल्हाधिकारी पालघर यांनी दिलेल्या आदेशाचा भंग केला म्हणुन सपोनि/उमेश पाटील, यांनी कासा पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र. II १०५/२०२१ भादविस कलम १८८ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

### ३. जमावबंदीचे उंल्लघन केल्या प्रकरणी २७ केसेस

पाच पेक्षा अधिक इसम एकत्र जमवुन जमावबंदीचे उंल्लघन केल्या प्रकरणी संपुर्ण पालघर जिल्हयात २७ केसेस करण्यात आल्या असुन २७,०००/- इतका दंड वसुल करण्यात आला आहे.

### ३. मास्क न परिधान केलेल्या २३ इसमांवर कारवाई

पालघर पोलीस दलाकडुन मास्क न परिधान केलेल्या २३ इसमांवर कारवाई करुन ११,५००/- रुपये दंड वसुल करण्यात आलेला आहे.

श्री.प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, अति. कार्यभार पोलीस अधीक्षक, पालघर यांच्यातर्फे जिल्हयातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोव्हीड १९ चा प्रादुर्भाव वाढत असुन तो रोखण्याकरिता महाराष्ट्र शासनाने दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. अन्यथा वरीलप्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी.

Scanned with CamScanner